आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता
५ जून २०२५ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जागतिक पर्यावरण दिनानिमित्त देशभरात वृक्षारोपण आणि पर्यावरण विषयक कार्यक्रम

- निवडणुका संपल्यानंतरची बिनचूक आकडेवारी आणि अहवाल तयार करण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगानं सुरू केली इंडेक्स कार्ड ही नवी तंत्रज्ञानाधारित प्रणाली

- बंगळुरू इथं झालेल्या चेंगराचेंगरीबाबत कर्नाटक उच्च न्यायालयानं कर्नाटक सरकारकडे सद्यस्थितीचा अहवाल मागितला

**आणि**

- इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रंकीरेड्डी उपांत्यपूर्व फेरीत दाखल

**<><><><>**

देशभरात आज जागतिक पर्यावरण दिवस साजरा झाला. पर्यावरण रक्षणाबाबत जागरूकता आणि प्रत्यक्ष कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघटनेनं १९७३ मध्ये आजच्या दिवशी सर्वप्रथम हा दिवस साजरा केला होता. हा दिवस १४३ हून अधिक राष्ट्रांमध्ये पर्यावरण संवर्धनाच्या विविध कार्यक्रमांच्या आयोजनाद्वारे साजरा केला जातो. ‘प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदूषणावर मात’ ही यंदाच्या पर्यावरण दिनाची मुख्य संकल्पना होती.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या.

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी** यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीत विशेष वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली. प्रधानमंत्र्यांनी यावेळी वटवृक्षाचं रोप लावलं. प्रधानमंत्र्यांनी आज आपल्या निवासस्थानी शेंदराची रोपं लावली. केंद्रीय मंत्री **धर्मेंद्र प्रधान** यांनी आज पर्यावरण दिनानिमित्त नवी दिल्लीत एक पेड माँ के नाम मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रारंभ केला.

**<><><><>**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राज्यातही विविध कार्यक्रमांचं आयोजित करण्यात आलं. या निमित्तानं **मुंबईत** आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वातावरण बदलाबाबत जनजागृती करण्यासाठी जागतिक प्रचार मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. एकल वापरासाठीचं प्लास्टिक हा पर्यावरणाचा सर्वात मोठा शत्रू असून त्याचा वापर थांबवणं हा पर्यावरण संवर्धनासाठीचा महत्वपूर्ण निर्णय असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. राज्य सरकारच्या १० कोटी वृक्षलागवड मोहिमेत नागरिकांनी सहभागी होण्याचं आवाहन त्यांनी केलं.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत **मुंबईत** गिरगाव चौपाटीवर एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक विरोधात मोहीम राबविण्यात आली. **नवी मुंबई, रत्नागिरी सोलापूर** इथे वृक्षारोपणाचे कार्यक्रम झाले. तर **जळगाव आणि छत्रपती संभाजी नगरमध्ये** सायकल रॅली काढण्यात आली.

**<><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं निवडणुका संपल्यानंतर तयार होणारे विविध आकडेवारी विषयक अहवाल जलदगतीनं तयार करण्यासाठी इंडेक्स कार्ड ही एक नवी तंत्रज्ञानाधारित प्रणाली सुरू केली आहे. इंडेक्स कार्ड ही निवडणूक आयोगाची स्वतःची मात्र कायद्यानं बंधनकारक नसलेली माहिती प्रणाली असेल. या माध्यमातून निवडणुकीनंतरची महत्त्वाची आकडेवारी संकलित केली जाईल. संशोधक, शिक्षणतज्ञ, धोरणकर्ते, पत्रकार आणि सामान्य नागरिकांना मतदारसंघनिहाय माहिती सुलभतेनं उपलब्ध व्हावी हा यामागचा हेतू असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

या इंडेक्स कार्डमध्ये उमेदवार, मतदार, मतदानाची टक्केवारी, मतमोजणीचा तपशील, पक्ष आणि उमेदवारांना मिळालेली मते, लिंगभावा नुसार मतदानाचं स्वरूप, प्रादेशिक स्तरावरचा फरक आणि राजकीय पक्षांची कामगिरी या आणि अशा स्वरुपाची माहिती मिळू शकणार आहे.

या नव्या तंत्रामुळे निवडणुकांनंतरचे अचूक अहवाल जलदगतीनं उपलब्ध होईल. या अहवालात राज्य तसंच मतदारसंघानुसार मतदारांचा तपशील, मतदान केंद्रांची संख्या, महिला मतदारांचा सहभाग, राष्ट्रीय तसंच राज्य पक्ष आणि नोंदणीकृत पक्षांची कामगिरी,

विजयी उमेदवारांविषयीचं विश्लेषण, मतदारसंघनिहाय निकाल आणि एकत्रित सारांश अहवाल उपलब्ध होऊ शकणार आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला ११ वर्ष पूर्ण झाली असून या कार्यकाळात देशातल्या जनतेची आर्थिक क्षमता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, जन धन योजना आणि आयुष्यमान भारत सारख्या विविध योजना शासनानं सुरू केल्या. या योजनांचा लाभ २५ कोटींहून अधिक जनतेनं घेतला असून देशातल्या पायाभूत सोयीसुविधा आणि आत्मनिर्भर भारत निर्माण करण्यावर केंद्र सरकार जोर देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सामाजिक माध्यमांवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या जम्मू आणि काश्मीरला भेट देणार आहेत. या भेटीत ते उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक हा २७२ किलोमीटर लांबीचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राष्ट्राला समर्पित करतील. या प्रकल्पासाठी सुमारे ४४ हजार कोटी रुपये खर्च केले गेले आहेत. हा प्रकल्प काश्मीर खोऱ्याला सर्व हंगामात देशाच्या उर्वरित भागाशी जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. या प्रकल्पामुळे या प्रदेशातील दळणवळणात क्रांती घडून येईल, तसंच सामाजिक आणि आर्थिक एकात्मतेला मोठी चालना मिळेल असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

या प्रकल्पाअंतर्गतच्याच चिनाब या जगातल्या सर्वात उंच कमानी रेल्वे पूलाचं तसंच तारांच्या सहाय्याने स्थिर केलेल्या अर्थात केबल स्टेड अंजी या भारतातल्या पहिला रेल्वे पूलाचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. आपल्या याच भेटी दरम्यान प्रधानमंत्री मोदी श्री माता वैष्णो देवी कटरा ते श्रीनगर आणि श्रीनगर ते कटरा या धावणाऱ्या वंदे भारत रेल्वे गाड्यांना हिरवा झेंडा दाखवणार आहेत.

याशिवाय प्रधानमंत्री कटरा इथं श्री माता वैष्णोदेवी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल एक्सलन्सची पायाभरणीही करतील. विविध रस्ते प्रकल्पांची पायाभरणी आणि काही प्रकल्पांचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

**<><><><>**

बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडीयमजवळ काल झालेल्या चेंगराचेंगरी बाबत कर्नाटक उच्च न्यायालयाने राज्य सरकारकडे सद्यस्थिती अहवाल मागितला आहे. इंडियन प्रीमिअर लीगमध्ये रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघाचा विजय साजरा करण्यासाठी झालेल्या कार्यक्रमात हजारो क्रिकेटप्रेमींनी विविध प्रवेशद्वारांमधून प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्यामुळे चेंगराचेंगरी झाली. त्यात ११ जणांचा मृत्यू झाला तर ३३ जण जखमी झाले. या संदर्भात दाखल झालेल्या स्युओमोटो जनहित याचिकेवर आज न्यायालयाने हे निर्देश दिले. पुढची सुनावणी येत्या मंगळवारी १० जून रोजी होणार आहे.

**<><><><>**

केंद्र सरकारनं बकरी ईदनिमित्त ६ जून २०२५ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर केल्याचा दावा करणारी एक पोस्ट समाजमाध्यमांवर फिरत आहे. मात्र या पोस्टमधला दावा तथ्यहीन आणि खोटा असल्याचं केंद्र सरकारनं स्पष्ट केलं आहे.  देशभरात अनेक भागांमध्ये ईद ६ जून रोजी साजरी केली जाणार असल्याची शक्यता असली तरी या दिवशी सरकारनं कोणतीही सुट्टी जाहीर केलेली नसल्याचं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

**<><><><>**

समृद्धी महामार्ग हा केवळ एक रस्ता नसून महाराष्ट्राच्या समृद्धीचा आर्थिक कॉरिडॉर आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केलं. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या इगतपुरी ते आमणे या ७५ किलोमीटरच्या अखेरच्या टप्प्याचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. राज्यातले २४ जिल्हे जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाशी जोडणाऱ्या समृद्धी महामार्गानं राज्याचं एकीकरण केलं. लवकरच हा महामार्ग नव्यानं तयार होत असलेल्या वाढवण बंदराशीही जोडला जाईल, यामुळे बंदर-केंद्रित विकास राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><>**

इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरी प्रकारात आज झालेल्या सामन्यात भारताची चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रंकीरेड्डी ही जोडी उपांत्यपूर्व फेरीत पोहोचली आहे. त्यांनी डेन्मार्कच्या रासमुस केजर आणि फ्रेडरिक सोगार्ड या जोडीचा १६-२१, २१-१८,२२-२० असा पराभव केला.

**<><><><>**

महिलांच्या हॉकी आशिया चषक २०२५ स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. ही स्पर्धा ५ ते १४ सप्टेंबर दरम्यान चीनमधल्या हांगझो शहरात खेळली जाणार आहे. या स्पर्धेत भारताच्या महिला हॉकी संघाचा पहिला सामना ५ सप्टेंबरला थायलंडच्या संघाबरोबर होणार आहे. भारतीय संघाचा समावेश ब गटात करण्यात आला असून जपान, थायलंड, सिंगापूर हे देशही याच गटात असतील.

**<><><><>**

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने दोन वेगवेगळ्या प्रकरणांची स्वतःहून दखल घेत मध्यप्रदेश तसंच तेलंगणाचे पोलिस महासंचालकांना नोटीस पाठवली आहे. मध्यप्रदेशात भिंड जिल्ह्यात दोन पत्रकारांच्या बाबतीत पोलिसांनी केलेल्या कथित मारहाणीबाबत प्रेस क्लबने काढलेल्या निवेदनाची स्वतःहून दखल घेत मानवाधिकार आयोगाने मध्यप्रदेशच्या पोलिस महासंचालकांना नोटीस बजावली आहे.

हे प्रकरण सामंजस्यानं सोडवल्याचं सांगणारा विडीयो तयार करण्यासाठी या पोलिसांनी दबाव आणल्याचंही या निवेदनात म्हटल आहे त्याबाबत आयोगाने आठवड्याभरात स्पष्टीकरण मागवलं आहे.

हैदराबादेत एका रिक्षावाल्याला पोलिस ठाण्यात झालेल्या मारहाणीनंतर त्याचा मृत्यू झाला. या घटनेबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं तेलंगणाच्या पोलिस महासंचालकांना नोटीस बजावली आहे.

**//<><><><>//**